राष्टीय अभियान तेलबिया व तेलताड लघु अभियान एक (तेलबिया) व राष्ट्रीय तेलबिया अभियान आणि तेलताड लघु अभियान - तीन (वृक्ष आधारीत तेलबिया) (National Mission on Oilseeds and Oil Palm( NMOOP)) राज्यात सन २०१४ - १५ मध्ये राबविण्यासाठी प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणेबाबत

**महाराष्ट्र शासन**

**कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः रागते-१२१४/ प्र.क्र.३१/४अे**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक

मंत्रालय विस्तार, मुंबई- ४०० ०३२

तारीख: १३ ऑगस्ट, २०१४

वाचा

१) केंद्र शासनाचे सहसचिव यांचे अर्धशासकीय पत्र क्र.१-६/२०१३-OS(TMOP), दि. २२ जानेवारी, २०१४

२) केंद्र शासनाने अभियाना संदर्भात http://agricoop.nic.in/dacdiviion/NMOOP२०१४.pdf या सांकेतस्थळावर उपलब्ध करून दिलेल्या मार्गदर्शक सूचना

३) शासन निर्णय क्रमांकः रागते-१२१४/प्र.क्र.३१/४अे, दि.०४ एप्रिल, २०१४

४) केंद्र शासनाचे पत्र क्र. ४-१/२०१४-NMOOP(coord.)/OS, दि. १८ जून, २०१४

५) केंद्र शासनाचे पत्र क्र. ४-१/२०१४-NMOOP (Coord)/OS,दि.१ जुलै, २०१४ (तीन पत्रे)

६) कृषी आयुक्तालयाचे पत्र क्र. कृ.आ./वि.प्र.-२/NMOOP १४-१५प्र.मा./२४५/१४, दि. २० जून, २०१४

७) कृषी आयुक्तालयाचे पत्र क्र. कृ.आ./वि.प्र.-२/NMOOP १४-१५प्र.वि.मा./२६१/१४, दि. १० जुलै, २०१४

८) कृषी आयुक्तालयाचे पत्र क्र. कृ.आ./वि.प्र.-२/NMOOP १४-१५प्र.वि.मा./२७१/१४, दि. २१ जुलै, २०१४

**प्रस्तावना**

केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय गळीत धान्य उत्पादन कार्यक्रम, राष्ट्रीय कडधान्य विकास कार्यक्रम व गतीमान मका विकास कार्यक्रम राज्यात सन २०१३-१४ पर्यंत राबविण्यात येत होता. केंद्र शासनाने बाराव्या पंचवार्षिक योजनेमध्ये सर्व केंद्र पुरस्कृत योजनांची पुर्नरचना केली आहे. त्यानुसार केंद्र पुरस्कृत एकात्मिक गळीतधान्य, कडधान्य, तेलताड व मका विकास कार्यक्रमाऐवजी राष्ट्रीय तेलबिया व तेलताड ( National Mission on Oilseed and Oil Palm) या अभियानाची सुरवात केली आहे. सदर अभियानाअंतर्गत उपअभियान- १ ( तेलबिया ), उपअभियान-२ (तेलताड) व उपअभियान-३ ( वृक्षआधारित तेलबिया) या तीन उपअभियानांचा समावेश असणार आहे. या अभियानाच्या निधीत केंद्र व राज्य हिश्याचे प्रमाण ७५:२५ असे आहे.

सन २०१४-१५ मध्ये सदर अभियान तेलबिया व वृक्षआधारित तेलबिया या दोन घटकांसाठीच राबविण्यात येणार आहे.

केंद्रीय कृषि मंत्रालयाच्या संदर्भाधीन अ.क्र. ४ च्या पत्रान्वये सन २०१४-१५ राष्ट्रीय तेलबिया व तेलताड ( National Mission on Oilseed and Oil Palm( NMOOP)) हे अभियान राज्यात राबविण्यासाठी ₹ ५९३४.४३ लाख निधीच्या कार्यक्रमास मंजूरी दिली आहे. सदर निधीमध्ये केंद्र व राज्य हिस्सा अनक्रमे ₹ ४५४४.१३ लाख व ₹ १३९०.३० लाख असणार आहे. तथापि, अभियानाची प्रकल्पाधारित स्वरूपात अमंलबजावणी करण्यासाठी केंद्र शासनाच्या बाबनिहाय मंजूर कार्यक्रमात कृषी आयुक्तालयाने केंद्र शासनाचे सहायक आयुक्त, डॉ. अनुपम बरीक यांची मान्यता घेऊन अंशत: फेरबदल केला असून केंद्र हिस्सा ₹ ४५४४.२८ लाख व राज्य हिस्सा ₹ १३९०.३६ असा मिळून एकूण ₹ ५९३४.६४ लाख निधीचा कार्यक्रम प्रस्तावित केला आहे.

केंद्रिय कृषि मंत्रालयाच्या संदर्भाधीन अ.क्र.५ च्या पत्रान्वये सदर अभियानाअंतर्गत केंद्र हिश्श्याच्या पहिल्या हप्त्यापोटी रू. १५९०.०० लाख निधी वितरित केला आहे. सदर निधीपैकी रू. २७०.०० लाख

अनुसूचित जाती, रू.१२७.०० लाख अनुसूचित जमाती व रू. ११९३.०० लाख निधी सर्वसाधारण घटकासाठी आहे.

कृषी आयुक्तालयाने सदर अभियानाअंतर्गत प्रस्तावित केलेल्या रू. ५९३४.६४ लाख (अक्षरी एकोणसाठ कोटी चौतीस लाख चौसष्ठ हजार फक्त) निधीच्या कार्यक्रमास प्रशासकीय मान्यता, तसेच केंद्र शासनाने सदर अभियानाअंतर्गत सन २०१४-१५ या आर्थिक वर्षामध्ये पहिल्या हप्त्यापोटी वितरीत केलेल्या रू.१५९०.०० लाख (अक्षरी रूपये पंधरा कोटी नव्वद लाख फक्त) निधीच्या कार्यक्रमास वित्तीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय</u>**

केंद्र शासनाने पुर्नरचना केलेल्या राष्ट्रीय तेलबिया व तेलताड (National Mission on Oilseed and Oil Palm (NMOOP)) या अभियानाअंतर्गत उपअभियान- १ (तेलबिया) व उपअभियान- ३ (वृक्षआधारित तेलबिया) राज्यात राबविण्यासाठी ₹ ५९३४.६४ लाख (अक्षरी एकोणसाठ कोटी चौतीस लाख चौसष्ठ हजार फक्त) निधीच्या कार्यक्रमास प्रशासकीय व केंद्र हिश्श्याच्या पहिल्या हप्त्यापोटी वितरित केलेला रू. १५९०.०० लाख (अक्षरी पंधरा कोटी नव्वद लाख फक्त) निधीच्या कार्यक्रमास शासनाची वित्तीय मान्यता या आदेशान्वये देण्यात येत आहे.

२. सदर अभियानाअंतर्गत केंद्र शासनाने मंजूरी दिलेल्या ₹५९३४.६४ लाख निधीचा उपअभियनिहाय कार्यक्रम पुढीलप्रमाणे राहील:-

**(रु. लाखात)**

| अ.क्र. | उपअभियानाचे नांव | केंद्र हिस्सा | राज्य हिस्सा | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | उपअभियान- १( तेलबिया ) | ४५००.१५ | १३७५.६५ | ५८७५.८० |
| २ | उपअभियान-३( वृक्षआधारित तेलबिया) | ४४.१३ | १४.७१ | ५८.८४ |
| एकूण | | ४५४४.२८ | १३९०.३६ | ५९३४.६४ |

३. केंद्र शासनाने पहिल्या हप्त्यापोटी वितरित केलेल्या रू.१५९०.०० लाख निधीचे योजना निहाय व संवर्गनिहाय वितरण खालीलप्रमाणे राहील:-

| अ. क्र. | उपअभियानाचे नाव | केंद्र हिस्सा | अनुसूचित जाती | अनुसूचित जमाती | सर्वसाधारण घटक |
|---|---|---|---|---|---|
| १ | उपअभियान-१ ( तेलबिया ) | १५७५.०० | २६७.४५ | १२५.८० | ११८१.७५ |
| २ | उपअभियान-३ (वृक्षआधारित तेलबिया) | १५.०० | २.५५ | १.२० | ११.२५ |
| एकूण | | १५९०.०० | २७०.०० | १२७.०० | ११९३.०० |

४. केंद्र शासनाने पहिल्या हप्त्यापोटी वितरित केलेल्या रू.१५९०.०० लाख निधीचा खर्च सन २०१४-१५ करिता खालील लेखाशिर्षाअंतर्गत मंजूर असलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा.

| अ. क्र. | लेखाशिर्ष | रक्कम (रूपये लाखात) |
|---|---|---|
| १ | **मागणी क्रमांक डी-३**<br>**२४०१,पीक संवर्धन**<br>**११४, तेलबियांचा विकास**<br>**(००) (०६) राष्ट्रीय अभियान तेलबिया व तेलताड**<br>**लघु अभियान-१ (तेलबिया) ( केंद्र हिस्सा ७५ टक्के)**<br>**(२४०१ २४९८) ३३- अर्थसहाय्य, (योजनांतर्गत) (दत्तमत)** | १५१४.८४ |

| | | |
|---|---|---|
| २ | मागणी क्रमांक डी-३<br>२४०१,पीक संवर्धन<br>११४, तेलबियांचा विकास<br>(००) (१०) राष्ट्रीय अभियान तेलबिया व तेलताड<br>लघु अभियान-१ (तेलबिया) (जि.प.) ( केंद्र हिस्सा ७५ टक्के)<br>(२४०१ ४६६१) ३१- सहाय्यक अनुदान, (वेतनेत्तर) | ६०.१५९९ |
| ३ | केंद्र हिस्सा (७५ टक्के)- मागणी क्रमांक डी-३<br>२४०१,पीक संवर्धन<br>११४ , तेलबियाणे विकास<br>(००) (०६) राष्ट्रीय तेलबिया व तेलताड अभियान<br>उपअभियान-३ (वृक्षआधारित तेलबिया) (केंद्र हिस्सा ७५ टक्के)<br>(२४०१ ९४९२) ३३- अर्थसहाय्य | १५.०० |

५. केंद्र शासनाने संदर्भाधीन अ.क्र. २ वर नमूद केलेल्या सांकेतस्थळाहावर वितरित केलेल्या मार्गदर्शक सूचना, तसेच दि.१८ जून, २०१४ च्या पत्रान्वये निर्गमित केलेल्या मागदर्शक सूचनांनुसार व मंजूर केलेल्या कृति आराखड्यानुसार सन २०१४-१५ मध्ये राष्ट्रीय तेलबिया व तेलताड अभियानाचा कार्यक्रम राबविण्यात येईल, याची दक्षता घेण्यात यावी. त्याचप्रमाणे दि. २६/०२/२०१४ च्या पत्रान्वये मंजूरी दिलेल्या अनुदानाच्या दराने व निकषाप्रमाणे कृती आराखड्याअंतर्गत मंजूर केलेल्या बाब निहाय कार्यक्रम राबविण्यात यावा. कोणत्याही परिस्थितीत मंजूर कार्यक्रमापेक्षा जास्तीचा कार्यक्रम राबविला जात नाही, याबाबत आवश्यक ती दक्षता घ्यावी.

६. राज्य हिश्श्याच्या जिल्हा नियोजन समितीच्या अखत्यारीतील तरतूदीस प्रशासकीय तसेच वित्तिय मान्यता संबंधित जिल्हाधिकारी यांचेकडून देण्यात येतील.

७. सदर निधी खर्च करताना तो विहित कार्यपध्दती अनुसरून सर्व वित्तीय कायदे/टेंडर नियमावली व नियमांचे /पक्रियेचे /वित्तीय अधिकारांच्या मर्यादेत/ P.W.D. मॅन्युअलचे अधिन राहून/C.V.C. तत्वानुसार/CAG च्या निदेंशानुसार /प्रचलित शासन निर्णय /नियम/परिपत्रक/तरतुदीनुसार, बजेट व कोषागर नियमावलीनुसार खर्च करण्याची कार्यवाही अमंलबजावणी यंत्रणानी करावी. कोणत्याही परिस्थितीत कुठलाही शासन नियम/अधिकाराचा भंग होणार नाही, याबाबत दक्षता घेण्याची जबाबदारी संबंधित क्षेत्रिय कार्यालयाची राहील.

८. राष्ट्रीय तेलबिया व तेलताड अभियानाच्या उद्दिष्ट पूर्तीसाठी संचालक (विस्तार व प्रशिक्षण), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना विचारात घेवून उद्दिष्टनिहाय सविस्तर मार्गदर्शक सूचना सर्व क्षेत्रीय अधिका-यांना निर्गमित कराव्यात. या मार्गदर्शक सूचना निर्गमित करतेवेळी पुढील प्रमुख बाबी अंतर्भूत करण्याची दक्षता घेण्यात यावी

I) लाभार्थी निवडताना लहान व सिमांतक शेतकरी, अनुसूचित जाती/जमाती शेतकरी व महिला लाभार्थी यांना प्राधान्य देण्यात यावे.

II) मंजूर निधीपैकी १७ टक्के निधी अनुसूचित जाती, ८ टक्के निधी अनुसूचित जमाती व ३० टक्के निधी महिला लाभार्थ्यांसाठी खर्च करण्यात यावा व याबाबतच्या नोंदी स्वतंत्रपणे ठेवण्यात याव्यात. तथापि, अनुसूचित जाती/ अनुसूचित जमाती यांच्यासाठी निधीचे वाटप करताना त्या-त्या जिल्ह्यात त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात करण्यात यावे.

III) सदर अभियान राबविताना क्षेत्र, उत्पादन व उत्पादकता हे अनुक्रमे ४९.६८लाख हेक्टर, ५७.४३ लाख टन व ११५६ कि.ग्रॅ/ हेक्टर एवढे लक्षांक साध्य होईल, व तेलबियाच्या बाबतीत किमान १० टक्के सिंचन क्षेत्रात वाढ होईल यावर भर देण्यात यावा .

IV) अभियानाचीची अमंलबजावणी अधिक प्रभावीपणे व परिणामकारकरित्या होण्याच्या दृष्टीने या अभियानाअंतर्गत प्रकल्पाधारित विकास / विस्तार कार्यक्रम राबविण्यात यावा.

V) प्रत्येक जिल्ह्याचा विस्तार व फलोत्पादन आराखडा तयार करण्यात येत आहे. त्यामध्ये या अभियानाचा अंतर्भाव गरजेनुरूप ठेवण्यात यावा.

VI) या अभियानाचे मुल्यमापन त्रयस्थ यंत्रणेकडून करून घ्यावे.

VII) सन २०१२-१३ मध्ये लाभ घेतलेल्या व २०१३-१४ मध्ये वैयक्तिक लाभ दिलेल्या लाभधारकांची यादी तालुका कार्यालये /पंचायत समिती/जिल्हाधिकारी कार्यालयात लावण्यात यावी. तसेच ती यादी विभागाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात यावी.

**९)** केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे या योजनेचा आर्थिक व भौतिक प्रगतीचा मासिक अहवाल प्रत्येक महिन्याला ५ तारखेपर्यंत केंद्र शासनाला तसेच राज्य शासनाला सादर होईल, व सदर अहवाल केद्र शासनास सादर करताना त्यामध्ये महिला शेतकरी, अनुसूचित जाती शेतकरी व अनुसूचित जमाती शेतकरी यांच्यासाठी निर्धारित केलेले भौतिक/आर्थिक लक्षांक व साध्य याबाबतची माहिती वेगळ्याने सादर होईल याबाबत दक्षता घेण्यात यावी.

**१०)** सदर शासन निर्णय वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र. २५२/१४/व्यय-१, दि. २८ जुलै, २०१४ नुसार दर्शविलेल्या सहमतीनुसार व अपर मुख्य सचिव (कृषी व पणन) यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४०८१३१५२२०१७९०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Siddharth Hoktuji Chawre

Digitally signed by Siddharth Hoktuji Chawre
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Agricultural and ADF, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Siddharth Hoktuji Chawre
Date: 2014.08.13 15:21:59 +05'30'

(सिध्दार्थ चवरे)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त कृषि, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे (५ प्रती)
२. संचालक (विस्तार व प्रशिक्षण), कृषि आयुक्तालय, पुणे
३. संचालक ( फलोत्पादन ), कृषि आयुक्तालय, पुणे
४. सर्व संचालक / सहसंचालक, कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य, पुणे-१
५. विभागीय आयुक्त (सर्व)
६. जिल्हाधिकारी, (सर्व)
७. सर्व सन्माननीय विधीमंडळ सदस्य
८. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, (सर्व)
९. विभागीय कृषि सहसंचालक (सर्व)
१०. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (सर्व)
११. कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१२. जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व)

१३. मुख्या लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, (सर्व)

१४. व्यवस्थापकीय संचालक, कृषि उद्योग विकास महामंडळ मर्यादित, आरे, दुग्ध कॉलनी गोरेगाव (पूर्व), मुंबई-६५

१५. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ, शास्त्रीनगर, अकोला.

१६.सहसंचालक लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासकीय भवन, पाचवा मजला, मंत्रालयासमोर, मुंबई

१७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परिक्षा) महाराष्ट्र १ /२, मुंबई / नागपूर

१८. महालेखाकार( स्थानीय निकाय लेखापरिक्षा व लेखा), प्रतिष्ठा भवन,१०१ महर्षी कर्वे मार्ग, मुंबई-४०० ०२०

१९. नियोजन विभाग (कार्यासन - १४३१ / कार्यासन - १४४४), मंत्रालय, मुंबई - ३२

२०. वित्त विभाग (व्यय-१) /अर्थसंकल्प -१३

२१. सामाजिक न्याय, क्रिडा व विशेष सहाय्य विभाग / आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

२२. ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय,मुंबई

२३. सर्व सह सचिव / उपसचिव / अवर सचिव, कृषि व पदुम विभाग (कृषि व फलोत्पादन प्रभाग)

२४. मा. मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव

२५. मा. राज्यमंत्री (कृषि ) यांचे खाजगी सचिव

२६. निवडनस्ती